आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७ वाजता

९ ऑगस्ट २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज संस्थगित/ लोकसभेत ११५ तास तर राज्यसभेत ९० तास कामकाज

- वक्फ सुधारणा विधेयकाच्या परीक्षणासाठी संयुक्त संसदीय समितीची स्थापना / अरविंद सावंत, नरेश म्हस्के, सुरेश म्हात्रे यांचा समितीत समावेश

- हर घर तिरंगा अभियानाला राज्यात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रारंभ/ ऑगस्ट क्रांतिदिनानिमित्त स्वातंत्र्य सैनिकांना विविध कार्यक्रमातून आदरांजली.

- कांदा निर्यात बंदीचा निर्णय चुकीचा होता आणि त्याचा फटका लोकसभा निवडणुकीत बसला असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं प्रतिपादन

**आणि**

- जागतिक आदिवासी दिन राज्यात साजरा

**<><><><><>**

संसदेच्या दोन्ही सदनांचं कामकाज आज निर्धारित वेळेआधी दोन दिवस संस्थगित करण्यात आलं. गेल्या महिन्यात २२ तारखेला सुरु झालेलं संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवारपर्यंत चालणार होतं.

लोकसभेत या अधिवेशन काळात १५ बैठका झाल्या, ११५ तास कामकाज झालं, अशी माहिती सभापती ओम बिर्ला यांनी दिली. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २३ जुलैला सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पावर २७ तास १९ मिनिटं चर्चा झाल्याचं त्यांनी सांगितलं. या अधिवेशन काळात लोकसभेत नवीन १२ विधेयकं मांडण्यात आली, त्यापैकी वित्त विधेयक, विनियोजन विधेयक, जम्मू काश्मीर

विनियोजन विधेयक आणि भारतीय वायुयान विधेयक ही ४ विधेयकं मंजूर झाली, अशी माहिती त्यांनी दिली.

राज्यसभेत केंद्रीय अर्थसंकल्पावर सुमारे २२ तास चर्चा झाली, असं सभापती जगदीप धनखड यांनी सांगितलं. या अधिवेशनात राज्यसभेत सुमारे ९० तास कामकाज झालं, असंही त्यांनी सांगितलं.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन महाराष्ट्रातील जनतेची मागणी पूर्ण करावी, अशी मागणी मुंबई वायव्य मतदारसंघाचे खासदार रविंद्र वायकर यांनी केली असून आज ती लोकसभेत पटलावर ठेवण्यात आली.

**<><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयकाच्या परीक्षणासाठी संयुक्त संसदीय समितीची स्थापना करण्याचा प्रस्ताव आज लोकसभेत मंजूर झाला. या समितीत लोकसभेतले २१ तर राज्यसभेतले १० खासदार आहेत. लोकसभेतले जदंबिका पाल, निशिकांत दुबे, तेजस्वी सूर्य, दिलीप साईकिया, गौरव गोगोई, नरेश म्हस्के, सुरेश म्हात्रे, अरविंद सावंत, इम्रान मसूद, मोहम्मद जावेद, असदउद्दीन ओवैसी, कल्याण बॅनर्जी या सदस्यांचा समावेश आहे. ही समिती संसदेच्या पुढच्या अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात शेवटच्या दिवशी अहवाल सादर करील असं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी ठराव मांडताना सांगितलं.

**<><><><><>**

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठीची नीट पीजी परीक्षा लांबणीवर टाकण्याची मागणी करणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. ही परीक्षा येत्या रविवारी ११ ऑगस्ट रोजी होणार आहे. या परीक्षेकरता अनेक उमेदवारांना त्यांच्या राहत्या ठिकाणापासून दूरवरची किंवा अतिशय गैरसोयीची केंद्र मिळाली असल्याचं याचिकेत म्हटलं होतं. परंतु, या कारणासाठी

सुमारे दोन लाख परीक्षार्थींचं भविष्य पणाला लावता येणार नाही, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे बी पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या पीठाने स्पष्ट केलं.

**<><><><><>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हस्ते आज मुंबईत ऑगस्ट क्रांती मैदानावर घरोघरी तिरंगा अभियानाचा प्रारंभ झाला. लाखो स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग आणि बलिदानातून देशाला स्वातंत्र्य मिळालं. त्यांच्या त्यागाची आणि बलिदानाची जाणीव तरुणांना व्हावी आणि त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना रूजावी, यासाठी 'घरोघरी तिरंगा अभियान' प्रेरणादायी ठरेल, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. या अभियानात मोठ्या संख्येनं सहभागी व्हावं असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भारत छोडो आंदोलनात भाग घेतलेल्या स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली वाहिली.

**राज्यात** विविध ठिकाणी घरोघरी तिरंगा अभियानाला सुरुवात झाली आहे.

**धुळ्यात** यानिमित्त एक बाईक रॅली आयोजित करण्यात आली होती, तर **वाशिम** शहरातही सायकलरॅली काढण्यात आली.

**अहमदनगर** जिल्ह्यात जामखेड इथं ७५ मीटर लांबीच्या तिरंग्याची यात्रा काढण्यात आली. **नांदेड आणि लातूरमधेही** तिरंगा यात्रा काढून हर घर तिरंगा उपक्रमाचा प्रारंभ झाला.

९ ऑगस्ट या क्रांती दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्या सैनिकांना आदरांजली वाहिली असून आजपासून हर घर तिरंगा अभियानात सहभागी होण्याचं आवाहन देशवासियांना केलं आहे.

**<><><><><>**

कोकण रेल्वेमार्गावरच्या स्थानकांचं सुशोभिकरण आणि फलाटावर शेड उभारण्याच्या कामासाठी राज्यशासनाकडून प्रस्ताव पाठवावा, असं खासदार नारायण राणे आज म्हणाले. ऑगस्ट क्रांतीदिनानिमित्त सिंधुदुर्ग जिल्ह्यात कणकवली रेल्वे स्थानकाच्या सुशोभन कामाचं लोकार्पण आज झालं. त्यावेळी ते बोलत होते. तर सिंधुदुर्ग किनारपट्टीचा विकास सिंगापूरच्या धर्तीवर करण्याला आपलं प्राधान्य असून त्यासाठी सिंगापूरच्या अभियंत्यांना इथं आमंत्रित केलं आहे, अशी माहिती सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिली. अशा विकासकामांसाठी सर्वांनी सहकार्य करावं असं आवाहनही चव्हाण यांनी केलं.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.

घरोघरी तिरंगा अभियानाविषयी अभिनेता प्रसाद ओक यांनी आकाशवाणीला सांगितलं…

**बाईट - प्रसाद ओक (१८ सेकंद )**

**<><><><><>**

कांदा निर्यातीवर बंदी घातल्यामुळे शेतकरी नाराज झाले, याचा फटका महायुतीला लोकसभा निवडणुकीत बसला. त्यामुळे कांदा निर्यातीवर बंदी लादण्याचा सरकारचा निर्णय चुकीचा होता, अशी कबुली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने काढलेल्या जनसन्मान यात्रेनिमित्त नाशिक जिल्ह्यातल्या लासलगाव इथं आयोजित लाडकी बहीण संवाद मेळाव्यात ते बोलत होते. तसंच राज्य

सरकारने सुरू केलेल्या जनहिताच्या योजना भविष्यातही सुरू राहतील अशी ग्वाही त्यांनी दिली. या मेळाव्यात मंत्री छगन भुजबळ, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे उपस्थित होते.

**<><><><><>**

“साखर परिषद आणि राष्ट्रीय कार्यक्षमता पुरस्कार २०२२-२३” या समारंभाचं आयोजन उद्या नवी दिल्लीत करण्यात आलं असून केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघटनेद्वारे हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सहकाराच्या आठ क्षेत्रांमधले राष्ट्रीय कार्यक्षमता पुरस्कार देखील यावेळी देण्यात येणार आहेत.

**<><><><><>**

जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी विकास विभागाने नंदुरबार इथं आयोजित केलेल्या कार्यक्रमात आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित यांनी आदिवासी विभाग आश्रमशाळा डिजीटल करण्याचं काम करत असल्याचं सांगितलं.

**हिंगोली** शहरातल्या क्रांतीसूर्य बिरसा मुंडा चौक इथं मान्यवरांनी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आदिवासी समाजाच्या विविध मागण्यांसाठी लाक्षणिक आंदोलन झालं.

**अहेरी** तालुक्यातल्या चेरपल्ली इथं अन्न आणि औषध प्रशासन मंत्री धर्मराव अत्राम यांनी आदिवासी भवनाचं लोकार्पण केलं. **देसईगंज** इथं क्रांतीसूर्य बिरसा मुंडा समितीने गुणवंत विद्यार्थी आणि जेष्ठ नागरिकांचा सत्कार केला.

**गडचिरोली**त तसंच **गोंदिया** जिल्ह्यात देवरी तालुक्यात चिंचगडमध्ये आदिवासी दिनानिमित्त आदिवासी बांधवांनी रॅली काढली. **पालघर** जिल्ह्यातही विविध कार्यक्रमांमधून जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला.

<><><><><>

यवतमाळमध्ये वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज प्रियदर्शिनी सहकारी सूत गिरणीचं लोकार्पण केलं. डबघाईला आलेल्या सूतगिरण्या खाजगी कंपनीला चालवायला देण्याचा निर्णय नवीन वस्त्रोद्योग धोरणात आहे असं त्यांनी सांगितलं. वस्त्रोद्योग मंत्रालयाने राज्यात घोषित केलेले वस्त्रोद्योग प्रकल्प यवतमाळ जिल्ह्यात आणण्याबाबत आपण स्थानिक आमदारांशी चर्चा करत आहोत, असंही त्यांनी सांगितलं. …

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या कणकवली, कुडाळ, सावंतवाडी मतदारसंघाचे जनता दरबार अनुक्रमे १२, १३ आणि १४ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत होतील, अशी माहिती जिल्ह्याचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिली. ओरोस इथं झालेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते.

<><><><><>

नाशिक शहरातल्या  सिडको परिसरात अवैध सावकारी करणाऱ्या व्यक्तीच्या घरावर उपनिबंधक कार्यालयाच्या पथकानं छापा टाकून कोरे आणि बिनतारखेचे धनादेश, मालमत्तेची कागदपत्रं जप्त केली आहेत.अवैध सावकारी व्यवहाराच्या संबंधानं आक्षेपार्ह कागदपत्रं  आढळून आल्यानं आरोपीवर अंबड पोलीस ठाण्यात अवैध सावकारीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक बाजार बंद होतांना ८२० अंकांनी वधारून ७९ हजार ७०६ अंकांवर पोहोचला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीतही २५० अंकांची वाढ होऊन तो २४ हजार ३६७ अंकांवर पोहोचला.

<><><><><>

राष्ट्रीय शेअर बाजाराच्या विशिष्ट नोंदणीकृत गुंतवणूकदारांच्या संख्येनं पहिल्यांदाच १० कोटींचा टप्पा पार केला आहे. मार्च २०२१ मध्ये नोंदणीकृत गुंतवणूकदारांची संख्या ४ कोटीवर पोहोचली होती. हा आकडा गाठण्यासाठी २५ वर्षांचा काळ लागला होता. या १० कोटी गुंतवणूकदारापैकी बहुसंख्य गुंतवणूकदार महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशातले आहेत.

**<><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आजच्या दिवशी कुस्ती, ॲथलेटिक्स आणि गोल्फ स्पर्धेत भारताचे खेळाडू मैदानात आहेत. कुस्ती स्पर्धेत पुरुषांच्या ५७ किलो वजनी गटात कास्यपदक पटकावण्याच्या उद्देशाने अमन सेहरावत आज रात्री लढत देईल. गोल्फमध्ये अदिती अशोक आणि दीक्षा डागर यांचा तिसऱ्या फेरीचा सामना सध्या सुरू आहे. दरम्यान, ॲथलेटिक्समध्ये महिला आणि पुरुष संघ ४०० मीटर रिले स्पर्धेत पुढच्या फेरीत जाण्यात अयशस्वी ठरले.भालाफेक स्पर्धेत नीरज चोप्रा यानं काल रौप्यपदकावर नाव कोरलं, तर पुरुष हॉकी संघानं कास्यपदकाला गवसणी घातली. या कामगिरीबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होतो आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नीरज चोप्राशी संवाद साधला आणि रौप्यपदक पटकावल्याबद्दल त्याचं अभिनंदन केलं.

**<><><><>**

येत्या दोन दिवसात कोकणात आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. कोकणात आणि घाट विभागात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात गुरुवारपासून पावसाचा जोर वाढला आहे. मच्छिमारांनी समुद्रात जाऊ नये, असा इशारा देण्यात आला आहे.

**//<><><><>//**